Jagdamba Education Society's
# Santosh N. Darade Polytechnic
At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

Accredited by
NATIONAL BOARD OF ACCREDITATION

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

**Date: 10/09/2025**

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

आपल्या वाटण्या, आतल्या वाटण्या...
आपलं महानगर My महानगर.com
www.mymahanagar.com

# दिनविशेष



## प्रसिद्ध व्हायोलिन वादक पं. श्रीधर पार्सेकर

व्हायोलिन वाद्यावर विलक्षण हुकूमत असणारा हनहुन्नरी कलाकार म्हणून श्रीधर पार्सेकर यांची ओळख होती. श्रीधर पार्सेकर हे संगीत दिग्दर्शकही होते. त्यांचा जन्म १ जानेवारी १९१० रोजी गोव्यातील पार्से गावी झाला. मामा परशुरामबुवा पार्सेकर यांच्याकडून संगीताचे आरंभीचे धडे घेतलेल्या पार्सेकरांनी बालवयातच गायन, तसेच तबला, हार्मोनिअम, जलतरंग या वाद्यांच्या वादनात प्राविण्य मिळवले. संगीताची अधिक सखोल आराधना करण्याचे स्वप्न घेऊन पार्सेकर चौदाव्या वर्षी मुंबईत आले. त्यांनी १९३४ ते १९३७ या काळात गजाननबुवांकडून व्हायोलिनवादनाचे धडे घेतले. त्यांनी मुंबई आकाशवाणीमध्ये व्हायोलिनवादक म्हणून सहा वर्षे नोकरी केली. गायनाचार्य वझेबुवा, मास्तर कृष्णराव, मास्तर दीनानाथ, ओंकारनाथ ठाकुर, फैयाज खां, विलायत खां अशा अनेक गवैयांना त्यांनी तोडीस तोड अशी साथसंगत केली. स्वरनिनाद (१९४८) हे व्हायोलिनविषयीचे पुस्तक त्यांनी लिहिले.

नाटक व चित्रपटांचे संगीतकार म्हणून पार्सेकरांनी १९४०-५० च्या दशकात आपला ठसा उमटवला. भक्त दामाजी, पैसा बोलतो आहे, कुबेर, भाग्यरेखा, सोन्याची लंका, मर्द मराठा, वाकडं पाऊल या सात चित्रपटांना त्यांनी संगीत दिले. त्यांनी स्वरबद्ध केलेले 'भक्त दामाजीतील' 'विठ्ठल गजरी अवघी दुमदुमली पंढरी' हे भजन लोकप्रिय झाले. ते दिंडीतही म्हटले जाई. नाटककार मो. ग. रांगणेकरांच्या नाट्यनिकेतन संस्थेसाठी कन्यादान, माझे घर, माहेर, रंभा, वहिनी, अपूर्व बंगाल, जयजयकार, अर्ध्या वाटेवर, हिमालयाची बायको या नऊ नाटकांना त्यांनी संगीतसाज चढवला. 'वहिनी'तील पु.ल. देशपांडेंनी गायलेली 'पाखरा जा' व 'ललना कुसुम कोमला' ही पदे गाजली होती. एच.एम.व्ही. कंपनीसाठी त्यांनी भावगीतेही स्वरबद्ध केली. श्रीधर पार्सेकर यांचे १० सप्टेंबर १९६४ रोजी निधन झाले.

Nashik Edition
Sep 10, 2025 Page No. 4
Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401